तरुण भारत
Akola Main | 2024-08-13 | Page- 7
epaper.tarunbharat.net

## महत्त्वाचे

### देशभक्तिपर नृत्य स्पर्धेत सहभाग घेण्याचे आवाहन

**वाशीम :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी येथील लॉयन्स क्लब तर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगष्ट रोजी 'उत्सव आझादी का' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात जिल्ह्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देशभक्तीपर नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा अकोला रोडवरील वाटाणे लॉनमध्ये ठेवण्यात आली असून, या स्पर्धेत भाग घेणाऱ्या जिल्ह्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांनी १४ ऑगष्टच्या आत आपल्या शाळेची नोंदणी त्वरित करून घ्यावी, असे आवाहन लॉयन्सचे डॉ. सिद्धार्थ देवळे व आशिष ठाकूर यांनी केले आहे.

### सायबर सुरक्षेविषयी काजळेश्वर येथे मार्गदर्शन

**काजळेश्वर :** स्थानिक ज्ञानप्रकाश विद्यालय येथे सायबर सुरक्षे बाबत मार्गदर्शन संपन्न झाले. या कार्यक्रमात सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, समाज माध्यमातून ऑनलाईन गुन्हे कसे घडतात, इंटरनेट आणि मोबाईलच्या माध्यमातून होणारी फसवणूक याविषयी विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण आणि सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच अशा ऑनलाईन फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आणि मोबाइलचा योग्य आणि मर्यादित वापर करण्यासाठी शपथ घेतली. ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला यांच्या सहकार्याने, क्विक हिल फाऊंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ. जे. एम. साबू आणि डॉ. एच. जे. खरात यांच्या मार्गदर्शनात आयोजित केली होती. यामध्ये सायबर वॉरियर्स सार्थक ठाकरे आणि सक्षम लोडम यांनी मार्गदर्शन केले. या वेळी प्राचार्य मोहन भाटकर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

### मोकाट कुत्र्यांची संख्या भरमसाट

**वाशीम :** शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या भरमसाट वाढली आहे. सर्वत्र मोकाट कुत्रे मुक्त फिरताना दिसत आहेत. त्यापैकी अनेक कुत्र्यांना खरूज झाल्याने ती कुत्रे पावसाळ्यात पिसाळण्याची शक्यता आहे. जर ही कुत्रे पिसाळली तर त्यापासून नागरिकांना धोका संभवू शकतो. नगर परिषद प्रशासनाने या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

Powered by iDocuments